# कामगारांचे भविष्य ‘सुरक्षित’ तसेच वर्तमान ‘सुखकर’ करणारा कर्मचारी भविष्य निधी (EPF) कायदा 1952 आणि त्याच्या अंतर्गत येणाऱ्या

## कर्मचारी भविष्य निधि योजना १९५२
## Employees Provident Fund Scheme

## कर्मचारी बीमा योजना १९७६
## Employees Deposit Linked Insurance Scheme

## कर्मचारी पेंशन योजना १९९५
## Employees Pension Scheme

कामगारांसाठी माहिती पुस्तिका - 01 May 2019

Information booklet for workers - 01 May 2019

*****************************************************************


कर्मचारी भविष्य निधी संगठन, क्षेत्रीय कार्यालय सोलापूर

EPFO Regional office, Solapur

*श्रम एवं रोजगार मंत्रालय, भारत सरकार  Ministry of Labour & Employment, Govt. of India*

१६५-ए, सुरवसे टॉवर्स, रेल्वे लाइन्स, सोलापूर – ४१३००१

165-A, Surwase Towers, Railway Lines, Solapur – 413 001.

Telephone-(0217) 2313226, 2313266, 2310052, 2316730, Fax-2319140

Email Id: ro.solapur@epfindia.gov.in

# EPF कायदा 1952 - इतिहास, उगम, प्रावधान आणि संवैधानिक तरतुद

**१९२५** साली तत्कालीन ब्रिटिश सरकार ने फक्त **शासकीय कर्मचाऱयां** साठी प्रोविडेंट फंड कायदा सुरु केला होता, तो गैर शासकीय कर्मचाऱ्यांना व इतर प्रायव्हेट उद्योगां मध्ये काम करणाऱ्या कामगारांना, मजुरांना लागू नव्हता . औद्योगिक कामगारांसाठी , श्रमिकांसाठी अस्तित्वात असलेल्या कायद्यां मध्ये सुधार करण्यासाठी, त्यांच्याचेही भविष्य सुरक्षित करण्यासाठी आणी सामाजिक सुरक्षा संबंधी नवे कायदे बनवण्याची गरज लक्षात घेता विचार मंथन करण्यासाठी **१९४०, १९४१ आणी १९४२** साली तीन कामगार परिषदा आयोजित करण्यात आल्या होत्या . परंतु या तिन्ही परिषदां मध्ये एक मोठी उणीव होती , ती म्हणजे या परिषदां मध्ये **फक्त सरकारचे प्रतिनिधी** बोलावण्यात आले होते , त्यामध्ये उद्योजकांचे प्रतिनिधी किंवा कामगारांचे प्रतिनिधी यांना बोलावण्यात आले नव्हते.

डॉ बाबासाहेब आंबेडकर १९४२ ते १९४६ दरम्यान व्हाइसरॉय कार्यकारी मंडळामध्ये मजूरमंत्री म्हणून कार्यरत होते, **ऑगस्ट १९४२** ला त्यांनी चौथी कामगार परिषद आयोजित केली होती , या परिषदेची दोन मुख्य वैशिष्ट्य होती - पहिले म्हणजे यामध्ये सरकारच्या प्रतिनिधी सोबतच उद्योगांचे प्रतिनिधी आणी कामगारांचे प्रतिनिधी यांना सुद्धा आमंत्रित करण्यात आले होते आणी दुसरे म्हणजे ह्या **त्रिपक्षीय यंत्रणे** च्या परिषदा नियमित स्वरूपात होण्यासाठी स्थायी व्यवस्था करण्यात आली होती . याच परिषदे मध्ये डॉ बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते " औद्योगिक कामगारांच्या कल्याणाचे प्रश्न तोवर सुटू शकत नाहीत जो पर्यंत शासन , उद्योजक आणी कामगार एकमेकां प्रति जबाबदारी चा दृष्टीकोन ठेवणार नाहीत , एकमेकांना सम्मान देणार नाहीत आणी सहमतीच्या भावनेने एकत्र काम करणार नाहीत ". याचा परिणाम असा कि आज औद्योगिक कामगारां संदर्भात जेवढेही राज्याचे वा केंद्रांचे कायदे आहेत त्या सर्वां मध्ये ही त्रिपक्षीय यंत्रणा दिसून येते.

याच वर्षी **१९४३** मध्ये “अंशदायी भविष्य निधी” (Contributory Provident Fund) च्या नियमांचे प्रारूप तयार करण्यात आले , त्यानंतर डॉ बाबासाहेब आंबेडकर धनबाद , राणीगंज येथील कोळश्याच्या खदानी मध्ये काम करणाऱ्या कामगारांची जोखमीची परिस्थिती बघण्यासाठी ४०० ते १००० फूट खोल खाणीं मध्ये उतरले आणी पाहणी केली . **१९४४** मध्ये कोळसा खदान मध्ये काम करणाऱ्या कामगारांसाठी कामगार कल्याण अध्यादेश (Coal Mines Labour Welfare Ordinance) जारी करण्यात आला ज्याचे पुढे **१९४८** मध्ये रूपांतर Coal Mines Provident Fund Act मध्ये झाले. भविष्य निधी कायदा हा सर्वप्रथम कोळसा खदानी मध्ये काम करणाऱ्या कामगारांसाठी लागू करण्यात आला आणी त्याच धर्तीवर **मार्च १९५२** साली **इतर उद्योगातील** कामगारांसाठी Employees Provident Fund Act पारित करण्यात आला.

भारतीय संविधानाच्या नीती निदेशक तत्वांना (Directive Principles of State Policy) आणी त्या मध्ये नेमके **कलम ४१** च्या प्रवधानांना कार्यान्वित करण्यासाठी EPF कायदा बनविण्यात आला होता . कलम ४१ हे बेरोजगारी , वृद्धावस्था, आजारपण, अपंगत्व, आणी अन्य आवश्यक परिस्थिती मध्ये

नागरिकांना साहाय्य पुरवण्याचे निर्देश राज्याला देते. या कायद्या अंतर्गत "भविष्य निधी योजना" ही **१ नवंबर १९५२** ला अमलात आली, त्यामुळे १ नवंबर हा EPFO स्थापना दिवस म्हणून साजरा केला जातो.

सुरुवातीला हा कायदा फक्त **सहा** उद्योगांना लागू केला होता , ते सहा उद्योग होते - सिमेंट, सिगारेट, कागद, टेक्सटाईल (कापड), लोखंड व स्टील , अभियांत्रिकी उत्पादने . या मध्ये सुद्धा फक्त त्याच कारखान्यांना हा कायदा लागू होता ज्या मध्ये **५० पेक्षा** जास्त कामगार आहेत आणी जे कारखाने **तीन वर्षा** पेक्षा जास्त काळापासून कार्यरत आहेत. आणी या सहा उद्योगातील सर्वच कामगारांना भविष्य निधी योजना लागू नव्हती, <u>ही योजना फक्त त्याच कामगाराना लागू होती ज्यांचे वेतन **३०० रूपये** महिना किंवा त्यापेक्षा कमी होते आणी ज्याची **एक वर्ष** सेवा / नौकरी पूर्ण झाली होती</u>. इतर कामगार या योजनेसाठी पात्र नव्हते. तेव्हा नियोक्ता / कंपनी मालक आणी कामगार दोघांनाही **एक आना दर रुपया** असे अंशदान भरावे लागत होते.

सुरवातीला EPF कायद्या अंतर्गत फक्त "भविष्य निधी योजना" हीच होती, **१९७१** साली "कर्मचारी कुटुंब पेन्शन योजना" लागू झाली, या मध्ये सेवे दरम्यान / नौकरी करताना जर कामगाराचा मृत्यु झाला तर त्याच्या पत्नीला / पतीला आणी मुलांना मासिक पेन्शन देण्याची तरतूद होती **परंतु कामगार जर सेवेतून निवृत्त झाला तर त्याला मासिक पेन्शन देण्याची सोय नव्हती** , अशा कामगाराला एक रकमी लाभ दिल्या जात होता. या योजने मध्ये , भविष्य निधी योजनेच्या अंशदाना सोबत कामगार , नियोक्ता / कंपनी / संस्था आणि केंद्र शासन यांना प्रत्येकी १.१६ % (मूळ पगार अधिक महागाई भत्ता वर) या दराने अंशदान करावे लागत होते.

**१९७६** ला “कर्मचारी बिमा योजना” लागू झाली. EPF कायद्या अंतर्गत ही तिसरी योजना होती , या मुळे खऱ्या अर्थाने कामगारांच्या व त्यांच्या कुटुंबांच्या भवितव्याची सुरक्षा परिपूर्ण झाली . या योजने मध्ये **कामगाराला त्याच्या वेतनातून कोणतेही योगदान करण्याची गरज नव्हती** , नियोक्ता / कंपनी / उद्योजक यांना ०.५% आणी केंद्र सरकार यांना ०.२५% एवढी रकम कामगारांच्या बिम्या साठी अतिरिक्त भरावी लागत होती. १९९५ नंतर केंद्र सरकार ने त्यांचे योगदान बंद केले . जो कामगार भविष्य निधी योजनेचा (EPF) चा सदस्य असेल तो बिमा योजनेचा पण सदस्य बनेल अशी तरतूद केल्या गेली. या योजने अंतर्गत जर कामगाराचा सेवेत / नौकरीत असताना कोणत्याही कारणांनी मृत्यु झाला तर त्याच्या वारसाला PF च्या राशी सोबतच बीमा योजनेची राशी सुद्धा मिळायला सुरुवात झाली , अशा स्थिती मध्ये पत्नीला / पतीला व लहान मुलांना पेन्शन देखील मिळत असे आणी अशा प्र कारे कुटूंबातील कमावत्या व्यक्तीचा जर मृत्यु झाला तरी तीनही योजने (भविष्य निधी योजना , कुटुंब पेन्शन योजना आणी बीमा योजना) द्वारे त्यांच्या कुटूंबाला पुढचे जीवन जगण्यासाठी एक भक्कम सोय करण्यात आली.

**१६/११/१९९५** पासून "कुटूंब पेन्शन योजने" च्या जागी **"कर्मचारी पेन्शन योजना"** सुरु करण्यात आली ज्या मध्ये १९७१ च्या योजनेमध्ये मिळणाऱ्या फायद्यां सोबत कामगाराला निवृत्ती नंतर मासिक पेन्शन ची

व्यवस्था करण्यात आली . या योजने मध्ये कामगारांना कोणत्याही प्रकारचे योगदान करण्याची गरज नव्हती, संस्थेच्या / मालकाच्या हिस्श्यातून मोठा हिस्सा पेन्शन फंडा मध्ये वळविण्यात आला.

**१९५२** ला EPF कायदा त्याच उद्योगांना / संस्थांना लागू होता **जे तीन वर्षा पासून कार्यरत आहेत** आणी ज्यांची **कामगार संख्या ५० च्या वर** आहे, **१९६०** पासून हा कायदा त्या उद्योगांना / संस्थांना लागू करण्यात आला ज्यांची कामगार संख्या **२० पेक्षा जास्त आणी ५० च्या कमी आहे** , परंतु असे उद्योग/संस्था पाच वर्षांपासून कार्यरत असण्याची अट होती. **१९८८** पासून कामगार संख्या २० पेक्षा जास्त आणी तीन वर्षा पासून जे उद्योग /संस्था कार्यरत आहेत अश्याना हा कायदा लागू करण्यात आला . **१९९७** पासून तीन वर्ष कार्यरत राहण्याची अट रद्द करण्यात आली आणी **ज्या दिवसा** पासून कामगार संख्या २० झाली त्या दिवसा पासूनच कायदा लागू करण्यात आला.

उद्योगाला / संस्थेला कायदा लागू झाल्यानंतर तो सर्व्याच कामगारांना लागू होत नव्हता, कायदा कोणत्या प्रकारच्या कामगारांना आणी कधी लागू होणार याचे दोन निकष होते , एक म्हणजे त्याच्या सेवेचा / नौकरीचा कार्यकाळ आणी दुसरे म्हणजे कामगाराचे वेतन. १९५२ मध्ये हा कायदा फक्त त्याच कामगाराना लागू होती ज्यांचे वेतन **३०० रूपये** महिना होते आणी ज्याची **एक वर्ष** सेवा / नौकरी पूर्ण झाली होती. पुढे हे दोन्ही निकष कसे बदलत गेले आणी जास्तीत जास्त कामगारांना याचा फायदा कसा झाला हे पुढील तखत्या मधून स्पष्ट होणार.

| **कालावधी / वर्ष** | **नौकरी मध्ये रुजू झाल्याच्या किती दिवसानंतर कायदा लागू** |
|---|---|
| 1952 ते 1974 | एक वर्षा नंतर |
| 1974 ते 1981 | सहा महिन्या नंतर |
| 1981 ते 1990 | तीन महिन्या नंतर |
| 1990 पासून पूढे | रुजू झाल्या च्या पाहिल्या दिवसा पासून |
| | |
| **कालावधी** | **कायदा लागू होण्यासाठी कामगाराचे वेतन** |
| 1952 ते 1957 | 300 पेक्षा कमी |
| 1957 ते 1962 | 500 पेक्षा कमी |
| 1962 ते 1976 | 1000 पेक्षा कमी |
| 1976 ते 1985 | 1600 पेक्षा कमी |
| 1985 ते 1990 | 2500 पेक्षा कमी |
| 1990 ते 1994 | 3500 पेक्षा कमी |
| 1994 ते 2001 | 5000 पेक्षा कमी |
| 2001 ते 2014 | 6500 पेक्षा कमी |
| ऑगस्ट 2014 पासून | 15,000 पेक्षा कमी |

# EPF कायद्याची थोडक्यात माहिती

1) भारतीय संविधानाच्या नीती निदेशक तत्वांना (Directive Principles of State Policy) आणी त्या मध्ये नेमके **कलम ४१ / Article 41** च्या प्रावधानांना कार्यान्वित करण्यासाठी EPF कायदा बनविण्यात आला आहे.

2) **कलम ४१** हे बेरोजगारी, वृद्धावस्था, आजारपण, अपंगत्व, आणी अन्य आवश्य क परिस्थिती मध्ये नागरिकांना सहाय्य पुरवण्याचे निर्देश राज्याला देते.

3) EPF कायदा हा **केंद्र शासनातील (भारत सरकार)** श्रम आणि रोजगार मंत्रालयाचा कायदा आहे (Ministry of Labour & Employment, Government of India)

4) EPF कायद्याची अंमलबजावणी आणि कार्यान्वन ची जबाबदारी ही केंद्र शासनातील श्रम आणि रोजगार मंत्रालयाच्या (Ministry of Labour & Employment, Government of India) अंतर्गत येणाऱ्या कर्मचारी भविष्य निधि संगठन (EPFO - Employees Provident Fund Organization) ची आहे.

5) कर्मचारी भविष्य निधि संगठन - EPFO ची सर्व राज्यात (जम्मू कश्मीर वगळता) **135** क्षेत्रीय कार्यालये (Regional offices) आणि **117** जिल्हा कार्यालये (District offices) आहेत.

6) ह्या कायद्या अंतर्गत कामगारांच्या सामाजिक सुरक्षेसाठी **तीन योजना** बनविण्यात आल्या आहेत

१) कर्मचारी भविष्य निधि योजना १९५२ (Employees Provident Fund Scheme)

२) कर्मचारी बीमा योजना १९७६ (Employees Deposit Linked Insurance Scheme)

३) कर्मचारी पेंशन योजना १९९५ (Employees Pension Scheme)

7) "कर्मचारी भविष्य निधी योजना" (EPF) ही **१ नवंबर १९५२** ला अमलात आली, त्यामुळे १ नवंबर हा EPFO स्थापना दिवस म्हणून साजरा केला जातो.

8) EPF कायदा त्या अनुसूचित **(शैडूल्ड)** व अधिसूचित **(नोटिफाईड)** कारखाने, उद्योग, कंपन्या, संस्थान, हॉटेल्स, हॉस्पिटल्स, शाळा, कॉलेजेस, युनिव्हर्सिटी, दुकाने, शोरूम, सिनेमा थिएटर्स, मॉल्स, प्रिंट मीडिया, इलेक्ट्रॉनिक मीडिया, बांधकाम क्षेत्र, शासकीय विभागात सेवा देण्यासाठी नियुक्त केलेले कंत्राटदार / एजेन्सी, कॉल सेंटर, सर्विस सेंटर इत्यादी याना लागु होतो ज्यांची कामगारांची संख्या २० किंवा २० पेक्षा जास्त आहे.

9) EPF कायदा **सर्व प्रकारच्या** कामगारांना लागू होतो - नियमीत कामगार, रोजंदारी कामगार, ठेकेदार कामगार, बदली कामगार, हंगामी कामगार जे कंपनी / संस्था च्या कामासाठी लावले आहेत आणि ज्यांचे मासिक वेतन / पगार **15,000** किंवा त्या पेक्षा कमी आहे.

10) EPF कायदा कामगार रुजू होण्याच्या **पहिल्या दिवसा पासूनच** लागू होतो. नौकरीच्या पहिल्या महिन्या पासून कामगारांच्या एकूण वेतन / पगारा मधील - मूळ वेतन, महागाई भत्ता, रिटेनिंग अलाउंस

याच्या **12%** रकम भविष्य निधी अंशदाना च्या स्वरुपात कपात केली जाते.

11) कारखाने, उद्योग, कंपन्या, संस्थान यांच्या मालकाना , नियोक्ताना सुद्धा **12%** अंशदान (3.67% भविष्य निधी मध्ये आणि 8.33% पेंशन योजने मध्ये) आणि कर्मचारी बीमा योजने साठी **0.5%** अंशदान भरावे लागते. या व्यतिरिक्त मालकाना, नियोक्ताना **0.5%** प्रशासकीय शुल्क सुद्धा भरावे लागते.

12) कामगाराचे **12%** आणि मालक / नियोक्ता यांचे **13%** असे एकूण **25%** रकमेचे ऑनलाइन चलन महिन्याच्या १५ तारखे पर्यन्त भविष्य निधि कार्यालाच्या (EPFO) च्या बैंक खात्या मध्ये जमा करावयाचे असते.

## भविष्य निधी कायद्या अंतर्गत अंशदानाचे दर
## Rates of contributions under EPF Act

| | **कामगार / कर्मचारी Employee / Worker** | **नियोक्ता / कंपनी / कंत्राटदार / संस्था Employer / Company / Contractor / Society** | |
|---|---|---|---|
| | अंशदान / वर्गणी Contributions | अंशदान / वर्गणी Contributions | *प्रशासकीय शुल्क Administrative charges* |
| कर्मचारी भविष्य निधी योजना (EPF scheme) | 12 % | 3.67 % | *0.5 %* |
| कर्मचारी पेन्शन योजना (EPS scheme) | NIL | 8.33 % | *NIL* |
| कर्मचारी बिमा योजना (EDLI scheme) | NIL | 0.5 % | *NIL* |
| **एकूण / Total** | **12 %** | **12.5 %** | ***0.5 %*** |
| कामगार / कर्मचारी / Employee / Worker 12 % | | नियोक्ता / कंपनी / कंत्राटदार / Employer / Contractor 13 % | |

**वरील प्रमाणे नियोक्ता / कंपनी / कंत्राटदार / संस्था / Employer / Company / Contractor / Society यांनी स्वतःचे 13% आणि कामगाराच्या वेतनातून कपात केलेले 12% एवढी रकम इलेक्ट्रॉनिक चलन कम रिटर्न (ECR) द्वारे ऑनलाईन पद्धतीनेच भविष्य निधी कार्यालयाच्या खात्यामध्ये दर महिन्याच्या १५ तारखेच्या आत जमा करायचे आहे.**

## EPF कायद्या अंतर्गत नियोक्ता / संस्था / कंपनी / मालक / कंत्राटदार यांच्या जबाबदाऱ्या

१. आपली संस्था / कंपनी चे **epfindia.gov.in** या वेबसाइट वर ऑनलाईन नोंदणी करणे.

२. संस्था / कंपनी मध्ये कर्मचाऱ्यांची संख्या ज्या तारखे पासून २० किंवा २० च्या वर झाली त्या तारखे पासूनच नोंदणी करणे.

३. मालकीचे रिटर्न / रिटर्न ऑफ ओनरशिप **(फॉर्म 5A)** मध्ये स्वतःची माहिती, पद / हुद्दा, पत्ता, ई-मेल, फोन नंबर देणे. या रिटर्न मध्ये जर Consultant / Agent / Middleman याची माहिती दिल्यास तो गुन्हा ठरतो.

४. ज्या कर्मचाऱ्याचा पगार **१५,०००** पेक्षा कमी आहे अशा सर्व कर्मचाऱ्यांना PF खाता नंबर व UAN - युनिव्हर्सल अकाउंट नंबर देणे.

५. जर कोणता कामगार नवीन लागला आहे तर त्याच्या आधीच्या सेवेची माहिती **फॉर्म नंबर ११** मध्ये भरून घेणे व UAN - युनिव्हर्सल अकाउंट नंबर च्या माध्यमातून त्याची आधीची सेवा चालू सेवे मध्ये जोडणे.

६. त्यां कामगाराने जर आधी कुठेही नौकरी केली नसल्यास त्याच्या PF नंबर सोबतच UAN - युनिव्हर्सल अकाउंट नंबर काढणे, UAN ला आधार, PAN, बँक अकाउंट सोबत जोडणे व DSC द्वारे अधिकृत करणे.

७. कामगारांना त्यांचा UAN सक्रिय (activate) करण्यासाठी मदत करणे.

८. सर्व पात्र कर्मचाऱ्यांच्या मासिक पगारातून १२ टक्के कपात करणे, स्वतःच्या हिश्याचे १२ टक्के व प्रशासकीय शुल्क देणे आणी इलेक्ट्रॉनिक चलान कम रिटर्न (ECR) द्वारे ही रकम भविष्य निधी कार्यालयाच्या खात्या मध्ये जमा करणे.

९. ही देय रकम पुढच्या महिन्याच्या **१५ तारखेच्या** आत भविष्य निधी कार्यालयाच्या खात्या मध्ये जमा करणे.

१०. **पेन्शन फॉर्म 10D, पेन्शन योजना प्रमाणपत्र फॉर्म 10C, मृत्यु दावा फॉर्म 20, बीमा दावा फॉर्म 5-IF** दाव्यांची तपासणी करणे, योग्य कागदपत्र जोडणे, दाव्यां वर नियमा प्रमाणे हस्ताक्षर करून ते दावे भविष्य निधी कार्यालया मध्ये जमा करणे.

११. संस्था / कंपनी मध्ये **कंत्राटदाराच्या** माध्यमातून जर कामगार लावले असतील आणी कंत्राटदार EPF मध्ये नोंदणीकृत **नसेल** तर अशा कामगारांचा सुद्धा EPF खाते व UAN काढणे, स्वतःच्या कामगारां प्रमाणे त्यांच्या मासिक पगारातून १२ टक्के कपात करणे, स्वतःच्या हिश्याचे १२ टक्के व प्रशासकीय

शुल्क देणे आणी इलेक्ट्रॉनिक चलान कम रिटर्न (ECR) द्वारे ही रकम भविष्य निधी कार्यालयाच्या खात्या मध्ये जमा करणे.

१२. कंत्राटदार जर EPF मध्ये नोंदणीकृत **<u>असेल</u>** तर त्याचे बिल मंजूर करण्यापूर्वी त्याने त्याच्या कामगारांचा EPF जमा केला कि नाही हे तपासणे.

१३. कंत्राटदाराची माहीती EPFO च्या Principle Employer पोर्टल वर अपलोड करणे.

१४. भविष्य निधी कार्यालयाचे अधिकारी चौकाशी / तपासणी साठी आल्यास त्यांनी मागितलेली माहिती आणी दस्तावेज पुरवणे.

# भविष्य निधी (EPF ) योजने चे फायदे / भविष्य निधी खाते बंद न करण्याचे फायदे

१) EPF खाते हे कामगारांच्या व त्याच्या कुटुंबाच्या ***अडचणीच्या वेळी*** आर्थिक मदत पुरवण्यासाठी आहे, हे खाते म्हणजे बँके मधले बचत खाते नव्हे.

२) वेतनातून कपात केलेला १२% निधी व संस्थेच्या / कंपनीच्या १२% पैकी ३.६७% निधी (८.३३% निधी पेन्शन खात्या मध्ये जातो) कामगारांच्या EPF खात्या मध्ये जमा होतो.

३) अशा प्रकारे जमा झालेल्या या दोन्ही रकमे वर चक्रवाढ पद्धतीने व्याज दिल्या जाते , EPF खात्या वरील व्याज हे इतर सरकारी योजने तील (PPF, नॅशनल सेविंग सर्टिफिकेट, सिनियर सिटीझन सेविंग स्कीम, पोस्ट ऑफिस मंथली इनकम स्कीम) व्याजा पेक्षा नेहमीच अधिक असते.

४) नौकरी सोडल्याच्या **तीन वर्षा** पर्यंत हे व्याज देण्यात येते, म्हणून नौकरी सोडल्याच्या तीन वर्षा च्या आधी EPF खाते बंद करून पैसे काढणे नुकसान कारक आहे.

५) नौकरी करताना EPF खात्यातून वेगवेगळ्या **अडचणीच्या वेळी** तुम्ही पैसे काढू शकता - घर बांधण्या साठी, घर विकत घेण्यासाठी, गृहकर्जाची परतफेड करण्यासाठी , आजारपणासाठी, शिक्षणासाठी, लग्नासाठी, कारखाना बंद पडल्याच्या स्थितीमध्ये, अपंगत्व आल्यावर लागणारी उपकरणे विकत घेण्यासाठी, नैसर्गिक आपत्ती च्या वेळी.

६) EPF खात्यातून पुढील स्थिती मध्ये संपूर्ण रकम काढता येते - नौकरी तुन ५५ वर्षे नंतर निवृत्त झाल्यावर, शारीरिक किंवा मानसिक अपंगत्वमुळे निवृत्त झाल्यावर , परदेशात नौकरी करण्यासाठी किंवा कायमचे वास्तव्य करण्यासाठी, वैयक्तिक किवा सामूहिक रित्या कामगारांची नौकरीतून कपात झाल्यावर.

७) या शिवाय इतर कारणांमुळे जर नौकरी सोडावी लागली आणी दोन महिने बेरोजगार राहून सुद्धा इतर ठिकाणी नौकरी नाही लागल्यास EPF खात्यातून संपूर्ण रकम काढता येते.

## नौकरीत असताना EPF खात्या मधून खालील कामासाठी पैसे काढता येतात

| अग्रीम / उचल | पात्रता |
|---|---|
| घर / जागा खरेदीसाठी | ५ वर्षे नोकरी व योजनेचे सदस्यत्व |
| राहत्या घराच्या अतिरिक्त बांधकामासाठी | राहते घर बांधून ५ वर्ष पूर्ण |
| बँकेतुन घरासाठी घेतलेले कर्ज परत फेडण्यासाठी | १० वर्ष नोकरी व योजनेचे सदस्यत्व |
| स्वतःच्या किंवा कुटुंबातील व्यक्तिंच्या आजारपणासाठी<br>- एक महिन्यापेक्षा जास्त दिवस हॉस्पिटल मध्ये भरती<br>- मोठ्या सर्जिकल ऑपेरेशन साठी<br>- टी बी / क्षय रोग /पॅरालीसिस / कॅन्सर / हृदय रोग / मानसिक रोग | सेवे ची अट नाही |
| स्वतःच्या, मुलांच्या, भावाच्या, बहिणीच्या  लग्न साठी | ७  वर्ष नोकरी व योजनेचे सदस्यत्व |
| मुलांच्या दहावी नंतर च्या शिक्षणासाठी | ७  वर्ष नोकरी व योजनेचे सदस्यत्व |
| १५ दिवसांपेक्षा जास्त दिवस कंपनी बंद पडली असेल किंवा लॉक अप असेल आणि कामगार बेरोजगार होवून त्यांना कोणतिही भरपाई मिळाली नसेल तर | |
| संपा व्यतिरिक्त अन्य कारणामुळे २ महिन्यां पेक्षा जास्त महीने कामगारांना पगार मिळाला नसेल तर | |
| कामगाराला नौकरीतून काढून टाकले असेल / रिटरेंच केले असेल आणि त्या विरोधात कामगार न्यायालयात गेला असेल तर | |
| सहा महिन्या पेक्षा जास्त दिवस कंपनी बंद पडली असेल किंवा लॉक अप असेल आणि कामगार बेरोजगार होवून त्यांना कोणतिही भरपाई मिळाली नसेल तर | |
| असाधारण आपत्ती / नैसर्गिक आपत्ती जसे पूर किंवा भूकंप किंवा दंगली इत्यादी कारणांमुळे जर कामगाराच्या संपत्तीचे नुकसान झाले असेल तर | |
| अपंगत्व आलेल्या कामगारांना अपंगत्वा साठी साहित्य विकत घ्यावयाचे असेल तर | |

# कर्मचारी पेन्शन योजना १९९५ - Employees Pension Scheme

**१)** या योजने चे सदस्य बनण्यासाठी कामगारांना त्यांच्या पगारातून कोणतीही वर्गणी / अंशदान द्यायची गरज नाही. जेव्हा कामगार भविष्य निधी योजनेचा सदस्य बनतो तेव्हा तो आपोआपच पेन्शन योजनेचा सुद्धा सदस्य बनतो.

**२)** कंपनी / संस्थे च्या १२% पैकी ८.३३% निधी कामगाराच्या पेन्शन खात्या मध्ये जातो, कंपनी / संस्थे नी हा ८.३३% निधी नाही भरला तरी देखील कामगा राना सर्व प्रकारच्या **पेन्शन ची सुविधा व सुरक्षा देण्याची हमी** EPF कायद्या मध्ये आहे.

**३)** नौकरीची **१० वर्ष** सेवा केल्यावर कामगार मासिक पेन्शन साठी पात्र ठरतो, वयाच्या **५०** वर्षानंतर कमी दराने पेन्शन मिळते आणी **५८** वर्षानंतर पूर्ण दराने पेन्शन मिळते.

**४)** १० वर्षां पेक्षा कमी काळ नौकरी केली असल्यास व ५० वर्षा ची आयु झाली नसल्यास पेन्शन ची रकम काढू नये, तसे केल्यास पेन्शन खाते बंद होते. त्या ऐवजी पेन्शन चे **योजना प्रमाणपत्र** काढावे जेणे करून ही पेन्शन सेवा पुढच्या सेवे मध्ये जोडल्या जाऊन कामगार व त्याचे कुटुंब भविष्या मध्ये मासिक पेन्शन साठी पात्र ठरतो.

**५)** EPF आणी पेन्शन चे खाते सुरु असल्यास व कामगाराचा नौकरी मध्ये लागून एक महिन्याच्या आतच मृत्यू झाला तरी देखील त्याच्या पत्नीला / पतीला मासिक पेन्शन दिली जाते व दोन मुलांना २५ वर्षे होई पर्यंत पेन्शन मिळते. कामगार जर अविवाहित असेल तर त्याच्या आई / वडिलांना पेन्शन प्राप्त होते.

**६)** EPF आणी पेन्शन चे खाते सुरु असल्यास व कामगाराचा नौकरी मध्ये लागून एक महिन्याच्या आतच कायमचे शारीरिक किवा मानसिक अपंगत्व आल्यास "अपंग पेन्शन" दिली जाते.

**७)** कामगाराने १० वर्ष पूर्ण होण्याच्या आधी नौकरी सोडली आणी नौकरी सोडल्या नंतर त्याचा मृत्यू झाला, अशा स्थिती मध्ये जर त्याचे EPF आणी पेन्शन खाते सुरु असले तर त्याच्या वारस / आई / वडील यांना PF च्या रक्मे सोबत पेन्शन च्या रक्मे चा परतावा दिला जातो.

# <u>कर्मचारी पेन्शन योजना (EPS) 1995 पेन्शन धारकांसाठी सूचना</u>

1) सर्व पेंशनरांना प्रत्येक वर्षा च्या नोवेम्बर महिन्यात आप ले जीवन प्रमाण पत्र / हयाती चा दाखला / लाइफ सर्टिफिकेट जमा करायचे असते. या हयाती च्या दाखल्या ची / जीवन प्रमाणपत्राची नोंदणी २०१६ पासून "डिजिटल पद्धति " ने करण्यात आली आहे . त्यामुळे कागदी स्वरूपातले हयाती चे दाखले स्वीकारल्या जात नाहीत.

२) दर वर्षी जीवन प्रमाणपत्र ची / लाइफ सर्टिफिकेट / हयाती च्या दाखल्याची डिजिटल नोंदणी आपण खालील ठिकाणी जाऊन करू शकता

- आपल्या जवळच्या आपले सरकार सेवा केन्द्र / कॉमन सर्विस सेंटर, ई सेवा / महा ई सेवा केंद्रा मध्ये.
- ज्या बँकेत पेन्शन जमा होते त्या बँकेत.

ह्या साठी पेन्शन धारकांना भविष्य निधी कार्यालय सोलापूर मध्ये यायची आवश्यकता नाही . डिजिटल नोंदणी ची व्यवस्था भविष्य निधि कार्यालय सोलापुर ला सुद्धा केलेली आहे.

३) जीवन प्रमाणपत्र ची / लाइफ सर्टिफिकेट / हयाती च्या दाखल्याची डिजिटल नोंदणी करण्यासाठी पेन्शनर स्वतः हजर पाहिजे , त्याने सोबत चार बाबी न्यायच्या आहेत - मोबाईल, आधार कार्ड, ज्या बँकेत पेन्शन जमा होते त्या बँके चे पासबुक आणी पेन्शन आर्डर नंबर. (PPO NO).

४) डिजिटल नोंदणी करताना आपण EPFO / EPS १९९५ / कर्मचारी पेन्शन योजना १९९५ चे पेन्शनर आहोत हे सांगणे गरजेचे आहे.

५) नोंदणी यशस्वी रित्या करणे साठी पेन्शनर च्या बोटांचे ठसे / डोळ्यांचा स्कॅन केला जातो आणि त्या सोबत आधार कार्ड लिंक केला जातो.

६) पेंशन आर्डर नंबर ची सुरुवात PUSLP नी होते , त्यानंतर आठ आकड़े असतात जसे - PUSLP00012345, पेंशन आर्डर नंबर ची डिजिटल नोंदणी याच क्रमानी करणे आवश्यक आहे. चुकीच्या पद्धती ने PPO ची नोंदणी झाली तर पेन्शन सुरु होणार नाही

७) जर कोणत्या पेन्शनर च्या बोटांचे ठसे / डोळ्यांचा स्कॅन होत नसेल तर असे पेन्शनर एका लेखी अर्जा मधे तसे नमूद करून आपला PPO नंबर, आधार कार्ड, बैंक पासबुक जोडून भविष्य निधी कार्यालय सोलापूर मध्ये जमा करू शकतात.

८) जर कोणता पेन्शनर विकलांग असेल, चालता येत नसेल , तब्येत खराब असल्यामुळे किंवा अशक्तपणामुळे जीवन प्रमाणपत्र ची / लाइफ सर्टिफिकेट / हयाती च्या दाखल्याची डिजिटल नोंदणी

करण्यासाठी प्रत्यक्ष जाऊ नसेल शकत तर त्यांच्या कुटुंबीयांनी तसे एका लेखी अर्जा मधे नमूद करून , सोबत वैद्यकीय कागदपत्रे जोडून, आपला PPO नंबर, आधार कार्ड, बैंक पासबुक सोबत भविष्य निधी कार्यालय सोलापूर मध्ये जमा करू शकतात.

# <u>पेन्शनसाठी जन्मतारीख दुरुस्त करण्याची कार्यालयीन प्रक्रिया</u>

जेव्हा भविष्य निधी कायदा कोणत्याही संस्थेला / कंपनीला लागू होतो तेव्हा त्यांचे कर्मचारी / कामगार यांच्या संदर्भात संपूर्ण माहिती - पूर्ण नाव, रुजू दिनांक, जन्मतारीख / वय इत्यादी भविष्य निधी कार्यालयाला त्या संस्थे / कंपनी कडून पुरविल्या जाते, जर दिलेली माहिती चुकीची असेल तर कर्मचारी / कामगाराना त्यांच्या EPF खात्यातून पैसे काढणे, पेन्शन मंजूर करून घेणे कठीण होते . अशा वेळेस कार्यलयाला बरोबर असलेली माहिती योग्य त्या कागदपत्रांसोबत देणे गरजेचे राहते.

Employees Pension Scheme १९९५ योजने मध्ये पेन्शनच्या पात्रते साठी आणि अचूक पेन्शनच्या गणनेसाठी जन्मतारीख फार महत्त्वाची ठरते , बऱ्याच कर्मचारी / कामगारांची जन्मतारीख भविष्य निधी कार्यालयाला चुकीची कळविण्यात आली होती . अशा वेळेस चुकीच्या जन्मता रखेची दुरुस्ती करण्यासाठी आणि बरोबर असलेल्या जन्मतारखेची नोंद करून घेण्यासाठी भविष्य निधी कार्यालयाच्या नवी दिल्ली येथील मुख्यालयाने वेळोवेळी सूचना दिलेल्या आहेत. त्या सूचनांवर आधारित खालील प्रक्रिया निर्धारित करण्यात आली आहे

**1)** भविष्य निधी कार्यालयात नोंदविलेल्या जन्म तारखे मध्ये जर **<u>एक वर्षा पेक्षा "कमी"</u>** फरक असेल तर पहिले जन्मतारखे ची दुरुस्ती कंपनी / संस्था यांच्या रेकॉर्ड मध्ये करून घ्यावी आणि त्या नंतर जन्म तारीख दुरुस्त करण्यासाठी कंपनी / संस्था आणि कामगार यांच्या सहीचे संयुक्त विनंती अर्ज (Joint request) आणि सोबत आधार कार्ड ची प्रत या कार्यालयात जमा करावी.

**2)** भविष्य निधी कार्यालयात नोंदविलेल्या जन्म तारखे मध्ये जर **<u>एक वर्षा पेक्षा "जास्त"</u>** फरक असेल तर पहिले जन्मतारखे ची दुरुस्ती कंपनी / संस्था यांच्या रेकॉर्ड मध्ये करून घ्यावी आणि त्या नंतर जन्म तारीख दुरुस्त करण्यासाठी भविष्य निधी कार्यालयात खालील कागदपत्रे जमा करावी :-

- कंपनी / संस्था आणि कामगार यांच्या सहीचे संयुक्त विनंती अर्ज (Joint request).
- आधार कार्ड ची प्रत ज्या मध्ये संपूर्ण जन्म तारीख नमूद आहे. .
- कोणताही एक पुरावा - जन्म दाखला, शाळेचा / कॉलेजचा दाखला, मॅट्रिकुलेशन सर्टिफिकेट / SSC बोर्ड सर्टिफिकेट, ESIC कार्ड, पॅन कार्ड, ड्रायविंग लाईसेन्स, पासपोर्ट, LIC पोलिसी, सरकारी कार्यालयाने जारी केलेले ओळखपत्र.
- कंपनी / संस्था ने दिलेले ओळखपत्र, जॉब कार्ड, वेतन पर्ची (पे स्लिप) ज्यावर जन्मतारीख नमूद केली असेल तर त्याची प्रत.

जर कंपनी / संस्था कर्मचाऱ्यांचे कोणतेही सर्विस रेकॉर्ड , माहिती पुस्तिका ठेवत नसेल तर कंपनी / संस्थे ने तसे त्यांच्या कार्यालयीन लेटर हेड वर लेखी कळवावे

**3)** जन्म तारखेचा पुरावा हा कंपनी / संस्था / अधिकारी / लोक प्रतिनिधी यांनी सत्यापित (अट्टेस्टेड) केला असला पाहिजे. भविष्य निधी कार्यालयातील जनसंपर्क अधिकारी किंवा काउंटर वर बसलेले अधिकारी यांना जन्म तारखेच्या

पुराव्याची मूळ प्रत (ओरिजिनल) दाखवून कामगार ते सत्यापित (अट्टेस्टेड) करून घेऊ शकतात. **संयुक्त विनंती अर्ज (Joint request) हा भविष्य निधी कार्यालयाने तयार केलेल्या नमुन्या मध्येच दिला पाहिजे. दलाल / एजन्ट / मध्यस्थ यांनी तयार केलेला संयुक्त विनंती अर्ज (Joint request) या पुढे स्वीकारल्या जाणार नाही.**

**4)** ज्या अशिक्षित कामगारांकडे जन्मतारखेचा कोणताच पुरावा नाही , त्यांनी जिल्हा शल्य चिकित्सक (सिविल सर्जन) द्वारे आपली वैद्यकीय तपासणी करून घ्यावी आणि त्या वैद्यकीय प्रमाणपत्राच्या आधारावर जिल्हा न्यायालयाकडे जन्मतारखेच्या संदर्भात आदेश मिळवून घ्यावा . जिल्हा न्यायालयाचा असा आदेश जन्मतारखे मध्ये दुरुस्ती करण्यासाठी ग्राह्य धरल्या जातो.

**5)** जन्म तारीख आणि नाव बदलण्याची प्रक्रिया ही ऑनलाइन सुद्धा करता, तसे करताना पुढील कागदपत्र अपलोड करावी

- संयुक्त विनंती अर्ज (Joint request)
- जन्म तारखेचे ओरिजिनल किंवा अटेस्टेड कागदपत्र
- कंपनी / संस्था ने दिलेले ओळखपत्र, जॉब कार्ड, वेतन पर्ची (पे स्लिप), कंपनी / संस्था ने कर्मचाऱ्यांचे तैयार केलेले सर्विस रेकॉर्ड, माहिती पुस्तिका ज्यावर जन्मतारीख नमूद केली असेल तर त्याची प्रत.
- जर कंपनी / संस्था कर्मचाऱ्यांचे कोणतेही सर्विस रेकॉर्ड, माहिती पुस्तिका ठेवत नसेल तर कंपनी / संस्थे चे तसे त्यांच्या कार्यालयीन लेटर हेड वर चे पत्र.

# <u>कर्मचारी बिमा योजना १९७६ - Employees Deposit Linked Insurance Scheme</u>

१) या योजने चे सदस्य बनण्यासाठी कामगारांना त्यांच्या पगारातून कोणतीही वर्गणी / अंशदान द्यायची गरज नाही. जेव्हा कामगार भविष्य निधी योजनेचा सदस्य बनतो तेव्हा तो आपोआपच बिमा योजनेचा सुद्धा सदस्य बनतो.

२) कामगार / कर्मचारी सेवेत असताना, नौकरी च्या कार्यकाळा दरम्यान जर मृत्यु / निधन झाल्यास पत्नी / पती ला तर बिम्याचे संरक्षण रकम दिली जाते.

३) या योजनेचा लाभ मिळण्यासाठी **फॉर्म 5 IF** भरावा आणी सोबत खालील कागदपत्र जोडावे

१. ओरिजिनल मृत्यू प्रमाणपत्र.

२. संस्था/ कंपनी / नियोक्ता चे कामगार / कर्मचारी सेवेत असताना मृत्यू झाल्याचे प्रमाणपत्र.

३. ज्या महिन्या मध्ये मृत्यू झाला त्या महिन्याचे आणि त्याच्या आधीच्या महिन्या चे हजेरी पत्रक / पगार पत्रक.

४. कामगार / कर्मचारी रजा घेऊन गेला असल्या त्याचा अर्ज आणि संस्थेनी दिलेली मंजुरी.

५. रजा घेतली नसताना सुद्धा सेवे मध्ये / नौकरी मध्ये ठेवण्याबाबत नियमाची प्रत.

# भविष्य निधी कायद्या अंतर्गत येणाऱ्या योजनांचा लाभ घेण्यासाठी विविध प्रकारचे अर्ज

| | |
|---|---|
| **फ़क्त ऑनलाइन पद्धती ने भरावयाचे अर्ज, हे दावे कागदी स्वरूपात स्वीकारल्या जात नाहीत** | |
| **फॉर्म १९** | सेवा निवृत्त झाल्यानंतर / नौकरी सोडल्यानंतर भविष्य निधी खाते बंद करून संपूर्ण निधी काढण्यासाठीचा अर्ज. |
| **फॉर्म ३१** | नौकरी मध्ये कार्यरत असताना भविष्य निधी खात्या मधून विविध कामांसाठी / गरजांसाठी ऍडव्हान्स, अग्रीम काढण्यासाठीचा अर्ज. |
| **फॉर्म १०(c)** | नौकरी सोडल्यानंतर पेन्शन खाते बंद करून पेन्शन निधी मिळविण्यासाठीचा अर्ज . (सहा महिन्या पेक्षा जास्त आणि १० वर्षा पेक्षा कमी काळ नौकरी केली असल्यास) |
| **फॉर्म १३** | भविष्य निधी ची रकम आणि सेवा एका खात्या मधून दुसऱ्या खात्या मध्ये ट्रान्सफर करण्यासाठीचा अर्ज. (नौकरी / कंपनी बदल्यानंतर) |
| | |
| पुढील चार दावे कागदी स्वरूपात स्वीकारण्यात येतात | |
| **फॉर्म १०(C)** | नौकरी सोडल्यानंतर पेन्शन खाते बंद न करता त्याच्या ऐवजी **पेन्शनस्कीम सर्टिफिकेट** मिळण्यासाठी अर्ज (जेणे करून भविष्या मध्ये कामगार आणि त्याच्या कुटुंबाला मासिक पेन्शन घेता येईल) |
| **फॉर्म १०(D)** | 1) १० वर्ष सेवा/नौकरी आणि वयाचे ५०/५८ वर्ष पूर्ण केल्यानंतर, सेवा निवृत्त झाल्यानंतर / नौकरी सोडल्यानंतर मासिक पेन्शन मिळण्यासाठीचा अर्ज.<br>2) सेवा / नौकरी करत असताना कामगाराचा मृत्यु झाल्यास त्याच्या पती / पत्नीला विधवा / विधुर पेन्शन मिळण्यासाठीचा अर्ज.<br>3) कामगार कोठेही सेवा / नौकरी करत नसेल पण **पेन्शनस्कीम सर्टिफिकेट** धारक असेल आणि ५८ वय होण्यापूर्वी त्याचा मृत्यु झाल्यास त्याच्या पती / पत्नीला विधवा / विधुर पेन्शन मिळण्यासाठी चा अर्ज. |
| **फॉर्म २०** | कर्मचारी / कामगाराचा मृत्यु झाल्यास भविष्य निधी खात्यातील संपूर्ण रकम मिळण्यासाठी त्याच्या पत्नी / पती / कुटुंबीय / नॉमिनी यांनी करावयाचा अर्ज. |
| **फॉर्म ५(IF)** | कर्मचारी / कामगाराचा नौकरी / सेवेच्या दरम्यान मृत्यु झाल्यास बिमा / इन्शुरन्स ची रकम मिळण्यासाठी त्याच्या पत्नी / पती / कुटुंबीय / नॉमिनी यांनी करावयाचा अर्ज. |

# <u>UAN युनिव्हर्सल अकाउंट नंबर आणि ऑनलाइन अर्ज</u>

**1.** उद्योगामध्ये वारंवार एक नौकरी सोडून दुसरी नौकरी करण्याचे , काम बदलण्याचे प्रमाण खूप वाढले आहे. त्याच बरोबर हंगामी स्वरूपाच्या उद्योगामध्ये काम करून स्थलांतर करण्याचे प्रमाण सुद्धा जास्त झाले आहे. **EPFO** द्वारे **जानेवारी २०१४** पासून युनिव्हर्सल अकाउंट नंबर **(UAN Universal Account Number)** सुरु करण्यात आला होता ज्याच्या माध्यमातून कर्मचाऱ्यांचे एका पेक्षा जास्त असणारे भविष्य निधी खाते **(PF** अकाउंट नंबर**)** एकत्रित करण्यात येतात**.** आता या प्राणाली चा उपयोग ऑनलाइन फॉर्म **19,** फॉर्म **31,** फॉर्म **10C** आणि फॉर्म **13** दाखल करण्यासाठी होत आहे. ऑनलाइन फॉर्म भरण्या साठी कामगारांना संस्था **/** कंपनी **/** नियोक्ता च्या सही ची गरज पडत नाही**,** हे दावे सरळ भविष्य निधी कार्यालया ला पोहचतात**.**

**2.** या साठी कर्मचाऱ्यांना त्यांचे आधार, बैंक अकाउंट, पॅन त्यांच्या UAN नम्बर ला जोडावे / लिंक करावे लागते आणि संस्था / कंपनी / नियोक्ता याना ते डिजिटली अप्रूव्ह / अनुमोदित करावे लागते . सर्व कर्मचाऱ्यांनी**,** कामगारांनी आपले आधार**,** बैंक अकाउंट ची प्रत व **IFSC** नंबर आपल्या नियोक्ता कड़े **/** कंपनी कड़े **/** संस्थे कड़े जमा करावे**,** ज्यांच्या जवळ पॅन कार्ड आहे त्यांनी आपले पॅन ची प्रत सुद्धा नियोक्ता **/** संस्थे कड़े जमा करावी**.**

**3.** कर्मचाऱ्यांना आपला **UAN** सक्रिय **(Activate)** करुन घ्यायचा आहे**,** त्या साठी कर्मचार्याला आपला मोबाईल क्रमांक आधार सोबत लिंक करावा लागेल**. UAN** सक्रिय **(Activate)** केल्या नंतर **UAN** आणि **PASSWORD** हा जपून ठेवायचा आहे**.** कर्मचारी जेव्हा हे चार फॉर्म **-** फॉर्म **19,** फॉर्म **31,** फॉर्म **10C** आणि फॉर्म **13 ONLINE** भरतील तेव्हा त्यांच्या आधार लिंकडं मोबाईल वर पासवर्ड येणार

**4. UAN** आणि आधार मधले नाव आणि जन्म तारीख ही तंतोतंत सारखीच असायला पाहिजे**.** जर नावा मध्ये **SPELLING MISTAKE** असेल किंवा **INITIAL** असलेले नाव पूर्ण लिहायचे असेल तर अशी दुरुस्ती ऑनलाइन पद्धति ने होऊ शकते**.** जन्म तारखे मध्ये तफावत असेल तर अशी दुरुस्ती सुद्धा ऑनलाइन पद्धति नी होऊ शकते. अशी दुरुस्ती **offline** किंवा कागदी स्वरूपात करण्यासाठी भविष्य निधि कार्यालय सोलापुर ने **दिसम्बर २०१७** मध्ये या संदर्भात जो **Joint request** चे प्रारूप जारी केलेले आहे ते भरून द्यावे लागणार आणि त्या सोबत लागणारे कागदपत्रे जोडावे लागणार**.** आधार आणि **UAN** मधले नाव आणि जन्म तारीख तंतोतंत सारखे असल्या शिवाय कर्मचाऱ्यांना **ऑनलाइन फॉर्म** भरता येत नाही**,** त्यामुळे ही दुरूस्ती ची प्रक्रिया पहिले पूर्ण करणे आवश्क आहे**.**

**5.** ज्या कर्मचाऱ्यांना **/** कामगारांना **UAN** मिळाला आहे अशा सर्व कर्मचाऱ्यांची **/** कामगाऱ्यांची सेवेत **/** नौकरी मध्ये रुजु झाल्याची तारीख आणी नौकरी सोडल्याची तारीख त्या संस्था **/** कंपनी **/** नियोक्ता ने

**ONLINE UPDATE** करायची आहे. सेवेत / नौकरी मध्ये रुजु झाल्याची तारीख आणी नौकरी सोडल्याची तारीख जर त्या संस्था / कंपनी / नियोक्ता ने ONLINE UPDATE केली नाही तर संबंधित कर्मचारी / कामगार त्याचा **ONLINE** अर्ज दाखल नाही करू शकणार.

**6. Online फॉर्म दाखल करण्या** EPFO च्या epfindia.gov.in या वेबसाईट वर जायचे आहे, डाव्या बाजूला असलेल्या **Online services** वर क्लिक करून **For Employees** क्लिक करायचे आहे आणी त्या नंतर **Member Online UAN Services** क्लिक करायचे आहे. हे केल्यावर **UAN Member E-Sewa** हे पोर्टल समोर येणार जिथे कर्मचाऱ्याला त्याचा UAN आणी Password टाकून लॉगिन करावे लागेल. या **UAN Member E-Sewa** पोर्टल वर लॉगिन करण्यासाठी सरळ **https://unifiedportal-mem.epfindia.gov.in/memberinterface/** या लिंक चा वापर सुद्धा करता येईल.

**7.** स्मार्ट फोन / अँड्रॉइड मोबाईल फोन द्वारे **Online फॉर्म** दाखल करण्यासाठी **Google Playstore** मधून **UMANG app** डाउनलोड करावा लागेल, UMANG app द्वारे Online दावे दाखल करण्या बरोबर कर्मचारी / सदस्य आपले पासबुक सुद्धा डाउनलोड करू शकतात.

## Online दावे दाखल करण्याचे दोन मार्ग

**पहिला मार्ग** - EPFO च्या epfindia.gov.in या संकेत स्थळावर जायचे आहे, डाव्या बाजूला असलेल्या Online services वर क्लिक करून For Employees क्लिक करायचे आहे आणी त्या नंतर Member Online UAN Services क्लिक करायचे आहे. हे केल्यावर UAN Member E-Sewa हे पोर्टल समोर येणार जिथे कर्मचाऱ्याला त्याचा UAN आणी Password टाकून लॉगिन करावे लागेल. या **UAN Member E-Sewa** पोर्टल वर लॉगिन करण्यासाठी सरळ https://unifiedportal-mem.epfindia.gov.in/memberinterface/ या लिंक चा वापर सुद्धा करता येईल.

UAN Member E - Sewa पोर्टल द्वारे कामगारांना / कर्मचाऱ्यांना फॉर्म १९, फॉर्म १०**(c)**, फॉर्म ३१ आणि फॉर्म १३ ONLINE दाखल करता येतील. त्याच बरोबर पुढील सेवा सुद्धा या पोर्टल वर उपलब्ध आहेत - UAN कार्ड प्रिंट करणे.

- आपल्या वेगवेगळ्या ठिकाणी केलेल्या सेवा आणि त्यांचे **PF** अकाउंट नंबर बघणे.
- बँक अकाउंट नंबर, आधार, पॅन, पासपोर्ट, ड्रायविंग लाइसेंन्स, इलेकशन कार्ड इत्यादी **UAN** सोबत जोडणे,
- वैयक्तिक माहिती जसे नाव, जन्मतारीख, मोबाइल नंबर, ई-मेल इत्यादी मध्ये दुरुस्ती करणे.

**<u>दुसरा मार्ग</u> - (**ज्या सदस्यां जवळ स्मार्ट मोबाईल फोन / अँड्रॉइड मोबाईल फोन आहेत त्यांच्या साठी**)**
**Google Playstore** मधून **UMANG app** डाउनलोड करावा लागेल, या app द्वारे Online दावे दाखल करण्यासाठी सुद्धा खालील बाबी पूर्ण झाल्या पाहिजेत **:-**

- UAN सक्रीय (activated) असला पाहिजे.
- UAN सोबत आधार, बँक अकाउंट, IFSC नंबर जोडला असला पाहिजे.
- संस्था / कंपनी / नियोक्ता ने डिजिटली अनुमोदित केले पाहिजे.
- UAN आणि आधार मधले नाव आणि जन्म तारीख ही सारखीच असायला पाहिजे.
- सेवेत / नौकरी मध्ये रुजु झाल्याची तारीख आणी नौकरी सोडल्याची तारीख संस्था / कंपनी / नियोक्ता ने ONLINE UPDATE केली पाहिजे.

UMANG app द्वारे Online दावे दाखल करण्या बरोबर कर्मचारी / सदस्य आपले पासबुक सुद्धा डाउनलोड करू शकतात .

## <u>ऑनलाइन दावे फाईल करण्याचे फायदे</u>

**a.** ऑनलाइन **F19, F10C, F31** भरण्या साठी कामगारांना संस्थाच्या / कंपनी च्या / नियोक्ता च्या सही ची गरज पडत नाही, हे दावे सरळ भविष्य निधी कार्यालया ला पोहचतात.
**b.** कर्मचाऱ्यांना, कामगारांना इतर जिल्ह्यातून, तालुक्यातून सोलापूर च्या भविष्य निधी कार्यालया ला येण्याची / रांगेत उभे राहण्याची गरज नाही. येण्या जाण्या चा खर्च आणि वेळ दोन्ही वाचणार.
**c.** ऑनलाइन दावांचा निपटारा ३ दिवसा च्या आत केला जातो.
**d.** ऑनलाइन दावे परत होण्याची शक्यता कमी असते.
**e.** ऑनलाइन दाव्या मध्ये चुक / गैरप्रकार होण्याची शक्यता कमी असते.

## <u>EPF च्या रक्मे वर १ जुन २०१५ पासून आयकर (इनकम टॅक्स) लागू करण्यात आला आहे</u>

- **पाच** वर्षा पेक्षा कमी नौकरी झाली असल्यास आणी EPF ची रकम **५०,०००** पेक्षा जास्त असल्यास, असे खाते बंद करून रकम काढल्यास खालील दरावर इनकम टॅक्स भरावा लागतो

  **०० %** - जर PAN आणी इनकम टॅक्स फॉर्म नं 15G / 15H जोडला असेल तर

**१० %** - फक्त PAN जोडला असेल तर

**३४ %** - जर PAN आणी फॉर्म नं 15G / 15H काहीच जोडले नसेल तर

- PF खात्या मधली रकम अडीच लाख पेक्षा जास्त असल्यास फॉर्म नं १५ G स्वीकारल्या जाणार नाही. PF खात्या मधली रकम तीन लाख पेक्षा जास्त असल्यास फॉर्म नं १५ H स्वीकारल्या जाणार नाही.

- **फॉर्म नं १५ G** साठ वर्षा खालील त्या व्यक्तीं साठी असतो ज्याच्या एकूण वार्षिक उत्पन्नावर कोणताही आयकर लागत नाही, म्हणजे ज्याचे एकूण वार्षिक उत्पन्न अडीच लाख पेक्षा कमी आहे.

- **फॉर्म नं १५ H** साठ वर्षा वरील ज्येष्ठ नागरिकांसाठी असतो ज्याच्या एकूण वार्षिक उत्पन्नावर कोणताही आयकर लागत नाही, म्हणजे ज्याचे एकूण वार्षिक उत्पन्न तीन लाख पेक्षा कमी आहे.

अशा कामगारांनी आपली EPF खात्या मधली रकम काढताना **PAN** आणी फॉर्म नं १५ G/ १५ H सोबत जोडावा जेणे करून तुमच्या भविष्य निधी खात्या तुन आयकर कपात केल्या जाणार नाही.